ARTHA, Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३४ पुणे, बुधवार, २० नोव्हेंबर, १९६८ अंक ११

"लक्ष्मीची पाउलें"



उंबरठ्यावर माप ठेविले, मी पायाने उलटुनि आले

गृहलक्ष्मीच्या मंगल आगमनाबरोबर अनेक जबाबदाऱ्याही तुमच्यावर आल्या आहेत. त्या व्यवस्थित पार पाडण्यास पैसे हवेत.
परंतु ते थोडेच झाडाला लागतात ? छे, ते तर सांठवावे लागतात.
त्याकरितां आजच महाराष्ट्र बँकेत बचत खाते उघडा.

आपली जिव्हाळ्याची बँक.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

---

**आमचे ग्राहक, आणि नाराज ?**

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

**दि बेळगाव बँक लिमिटेड**

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

### स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. चा वाढता पराक्रम

१९६८ च्या पहिल्या नऊ महिन्यात स्वस्तिकने ३१२.५५ लक्ष रुपये किमतीच्या मालाची विक्री केली. गेल्या वर्षीच्या पहिल्या नऊमाहीचा तत्सम आकडा २१०.०८ लक्ष रुपये होता. निर्गतीचे बाबतीतही कंपनीची प्रगती उल्लेखनीय आहे. १९६७ च्या सबंध वर्षात कंपनीने ३६.१७ लक्ष रुपयांची निर्गत केली होती; १९६८ च्या पहिल्या ९ महिन्यांतीलच निर्गत ५६.५५ लाखांवर गेली आहे. हाती असलेल्या ऑर्डरी विचारात घेता, १९६७ च्या मानाने १९६८ मधील पराक्रम ४०% तरी अधिक होईल.

कंपनीचे बिझिनेस मॅनेजर श्री. व्ही. व्ही. बेनाडीकर दि. २० ऑक्टोबर, १९६८ रोजी रशिया, ईस्ट युरोपियन देश व मध्य पूर्वेतील देशांशी स्वस्तिकच्या निर्यात व्यापार विकासाचे ४२ दिवसांचे दौऱ्यासाठी मॉस्कोला रवाना झाले. आपल्या भेटीत श्री. बेनाडीकर मॉस्को, पोलंड, इंग्लंड, बल्गेरिया, रुमानिया, युगोस्लाव्हीया, स्वीडन, इराण, ग्रीस, लेबेनॉन इत्यादी देशांना भेट देऊन स्वस्तिकच्या विविध उत्पादनांच्या निर्यातीत वाढ करण्याचे दृष्टीने पाहणी करणार आहेत.

### छोट्या मोटारींचा कारखाना

भारतात छोट्या, कमी किंमतीच्या मोटारींचा कारखाना काढण्यासाठी १४ योजना भारत सरकारच्या विचाराधीन आहेत. त्यात फ्रान्सची रेनॉ कंपनी, जपानची माझदा कंपनी आणि युगोस्लाव्हिआ व पश्चिम जर्मनीतील कंपन्या ह्यांच्याही योजना आहेत. रेनॉ कंपनीने संकल्पित छोटी मोटार ११,००० रुपयांना देऊ केली आहे, तर जपानी कंपनीने ६,७०० रुपयांना देऊ केली आहे. आता ह्या स्पर्धेत पंतप्रधान इंदिराजी गांधी ह्यांचे चिरंजीव श्री. संजय गांधी उतरले आहेत. त्यांनी सुचविलेल्या योजनेप्रमाणे छोटी मोटार ६ हजार रुपयांना मिळू शकेल. तिची जास्तीत जास्त गती दर तासाला ५३ मैल असेल. एक गॅलन पेट्रोलच्या जळणात ही गाडी ५६ मैल पळू शकेल असा दावा त्यांनी केला आहे.

### ॲग्रिकल्चरल रिफायनॅन्स कॉर्पोरेशनची कामगिरी

कॉर्पोरेशनचा १९६७–६८ सालचा अहवाल अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनी लोकसभेला सादर केला. १९६८ च्या ३० जूनपर्यंत पुऱ्या झालेल्या वर्षी कॉर्पोरेशनने शेतीविषयक ८९ योजनांना मंजुरी दिली, आणि योजनांसाठी ५८.६४ कोटी रुपये उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यामागील ४ वर्षांच्या मानाने अहवालाच्या सालात कॉर्पोरेशनने अधिक आर्थिक जबाबदारी उचलली आहे. अहवालाच्या सालाच्या मागील ४ वर्षांत अवघ्या ३९ योजनांना मंजुरी देण्यात आली होती, व त्यासाठी ३९.९५कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. आतापर्यंत कॉर्पोरेशनने मंजूर केलेल्या योजनांपैकी ५४ छोट्या प्रमाणावरील पाणीपुरवठ्याच्या आहेत, २४भूविकासाच्या आहेत, २७मळ्यांच्या विकासाच्या आहेत आणि ५मच्छीमारीच्या आहेत.


तारेचा पत्ता "मॉर्गेज" मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७ उपकार्यालय दूरध्वनी क्र. २५६५२७

## मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.


नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर
कार्यकारी संचालक



महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

## – न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २० नोव्हेंबर १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*


## निर्यातीत वाढ आणि आयातीत घट झाली

१९६८ च्या जानेवारी ते जुलै अखेरच्या काळांत भारताची ह्याच कालातील गेल्या वर्षीच्या निर्यातीच्या मानाने ३९ कोटी रुपये किंमतीच्या मालाची अधिक निर्यात झाली आहे. त्याच-बरोबर ह्याच कालामधील आयातीत १२३·३० कोटी रुपये किमतीच्या मालाची घट झाली आहे. १९६८ सालच्या पहिल्या ७ महिन्यांत ७१७·३० कोटी रुपयांच्या मालाची निर्यात करण्यात आली. गेल्या वर्षीच्या ह्याच काळातील निर्यातीचा आकडा ६७८ कोटी रुपयांचा आहे. आयातीचे आकडे अनुक्रमे १,३०६·७० कोटी व १,१८३·४० कोटी असे आहेत. निर्यात मालाच्या प्रकारातही समाधानकारक प्रवृत्ती दिसून येत आहे. १९६७ सालच्या पहिल्या ७ महिन्यांत नेहमीच्या परंपरागत मालाची निर्यात करून ४२३·८० कोटी रुपये मिळविण्यात आले होते. चालू वर्षाच्या ७ महिन्यांत हा आकडा ४०७·७० कोटी रुपयांपर्यंत घटला आहे. परंतु नेहमीच्या चाकोरीबाहेरील निर्यातीने मात्र ह्या वर्षी अधिक बळ धरले आहे. १९६७ साली नेहमीपेक्षा निराळ्या मालाची निर्यात २५१·८० कोटी रुपयांची झाली होती. चालू वर्षी ही निर्यात ३०५·४० कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. निर्यातीच्या मालात पडलेला हा फरक उत्साहवर्धक म्हणण्यास हरकत नाही. तथापि हा फरक तसाच पुढे चालू राहील असे मानता येणार नाही. निर्यातीच्या नेहमीच्या मालापेक्षा वेगळा आणि विविध प्रकारचा माल निर्यात करण्यात आलेले अल्पसे यश चांगल्या भविष्य-कालाची पहिली लंगडी पावले आहेत, असे फार तर म्हणता येईल. निर्यात व्यापारात सर्वस्वी नवे पान उघडण्यात आले आहे असा त्याचा अर्थ नाही, असा इषारा तज्ज्ञ देत आहेत.

## शास्त्रज्ञांना व तंत्रज्ञांना ब्रिटनचे आकर्षण

कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेने भारतामधून जाऊन ब्रिटनमध्ये स्थायिक होणाऱ्या शास्त्रज्ञांची व तंत्रज्ञांची माहिती एका पाहणीत जमविली आहे. त्यावरून पुढील चित्र उभे राहते. दरसाल सुमारे २ हजार हिंदी शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ स्थायिक होण्याच्या हेतूने ब्रिटनला जात असतात. ब्रिटनमध्ये जाणारे डॉक्टर्स आणि परिचारिका ह्यांच्या संख्येत हळूहळू वाढ होत चाललेली आहे. गेल्या काही वर्षात परदेशी जाणाऱ्या तंत्रज्ञांच्या संख्येत मात्र थोडीफार घट झाली आहे. ब्रिटिश सरकारने देऊ केलेल्या नोकऱ्यांचा फायदा घेऊन १९६७ साली ८०० डॉक्टर्स आणि ३५० शिक्षक ब्रिटनला गेले. भारतामधून ब्रिटनला जाणाऱ्यांची संख्या दरसाल सुमारे ५० हजार इतकी आहे. त्यांपैकी निम्मे पुरुष असतात आणि प्रत्येकी एक चतुर्थांश स्त्रिया व मुले असतात. पुष्कळसे लोक केवळ प्रवासासाठी जातात. त्याशिवाय विद्यार्थी, ब्रिटनमध्ये नोकऱ्या असणाऱ्यांचे नातेवाईक, हेही असतात. त्यांच्यापैकी बरेचसे पुन्हा भारताला परत येतात. ब्रिटिश सरकार दोन तऱ्हेचे परवाने देते. 'ए' परवाना ज्यांना देण्यात येतो त्यांना ब्रिटनच्या कार-खान्यांत नोकऱ्या मिळालेल्या असतात. त्याशिवाय सरकार कारखान्यांना लागणाऱ्या नोकरांची नोंद करीत असते. अशा नोंदीत समाविष्ट करण्यासाठी हा 'ए' परवाना दिला जातो. 'बी' परवाना हा डॉक्टर्स, प्रशिक्षित परिचारिका, प्रशिक्षित शिक्षक, शास्त्र व तंत्रशास्त्रेचे पदवीधर, ह्यांना देण्यात येतो. कॉमनवेल्थ राष्ट्रगटातून वरील दोन्ही परवान्यांनी दरसाल सुमारे ६,५०० नागरिकांना ब्रिटनमध्ये प्रवेश देण्यात येतो.

## लोखंडाच्या खनिजाची जपानला आवश्यकता

मद्रास राज्यातील बेल्लारी–हॉस्पेट भागात लोखंडाचे खनिज सापडते. ह्या भागातील खनिज आयात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी एका मोठ्या जपानी पोलाद कारखान्याचे जनरल मॅनेजर मद्रासला आले होते. ही कंपनी भारतात सध्या तयार होणाऱ्या पोलादापेक्षाही अधिक पोलाद तयार करते. कंपनी गोव्यातील लोखंडाच्या खनिजाची आयात गेली २० वर्षे करीत आहे. पण तिला अधिक खनिजाची जरूरी आहे. मद्रास बंदरात बोटींवर चढविण्यासाठी आणलेले बेल्लारी-हॉस्पेट भागातील खनिज चांगल्या प्रतीचे आहे, असे मत मॅनेजरनी व्यक्त केले. परंतु मोठ्या प्रमाणावर खनिजाची आयात करण्याच्या कामी एक मोठी अडचण असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की जपानमधील बंदरे १ लाख टन खनिज वाहून आणणाऱ्या बोटी आपल्या धक्क्यावर आणू शकतात. लवकरच १॥ लाख टन वाहतूक करणाऱ्या बोटी लागू शकणारे धक्केही तयार करण्यात येत आहेत. पण भारतामधील बंदरांतून इतक्या मोठ्या बोटी मावण्यासारखे धक्के नाहीत. त्यामुळे वाहतुकीचे काम वेगाने करणे कठीण होते. जपान भारतामधून खनिज आयात करतो ते सर्व स्वतःच्या बोटींतून नेतो. कारण, मोठ्या प्रमाणावर वाहतूक करणाऱ्या बोटीच भारताजवळ नाहीत.

## सहकारी चळवळीचे नेतृत्व श्रद्धाहीन व्यक्तींचेकडे

### अपप्रवृत्तींवर श्री. गुलाबराव पाटील ह्यांची टीका

( सहकारी प्रशिक्षण केंद्र, पुणे, पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ मर्यादित, पुणे व पुणे जिल्हा सहकारी बोर्ड लि. पुणे यांचे वतीने दि. ३-११-१९६८ रोजी आयोजित केलेल्या परिसंवादात खासदार श्री. गुलाबराव पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई, ह्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण )

" सहकारावर ज्यांची श्रद्धा नाही, असे लोक ह्या क्षेत्राचे नेतृत्व करीत आहेत. त्यांनी आज सहकारी संस्थांच्या प्रमुख जागा आपल्या हातात ठेवल्या असून त्यांना तेथून काढले नाही तर भविष्यकाळात महाराष्ट्रातील चळवळीला पुच्छगती प्राप्त होईल.

### सहकारी शिक्षणाबद्दल उदासीनता

" महाराष्ट्रात आतापर्यंत सहकारी संस्थांचे सुमारे ५ लाख सभासद शिकून तयार झाले. परंतु हे आकडे कागदावरील वाटतात. शिक्षणासाठी साधने, पैसा व शिक्षक निर्माण केले तरी ज्याला हे शिक्षण द्यावयाचे ते किती स्वेच्छेने येतात हे पाहिले पाहिजे. ते यावेत म्हणून विद्यावेतन द्यावे लागते व विद्यावेतन मिळते म्हणून ते येतात अशी आजची परिस्थिती आहे. आजच्या परिसंवादास सहकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित नाहीत. वास्तविक हे त्यांच्यासाठी आहे. सहकारी शिक्षणाबाबत समाजात आज औदासीन्य आहे. याचे कारण ग्रामीण पातळीवरची आजची नेतेमंडळीच उदासीन आहेत आणि प्रशिक्षित नाहीत. त्यामुळे प्रशिक्षणाशिवाय नेतेपण मिळविता येते, अशी सर्वसाधारण समजूत झालेली आहे. ज्यांना प्रशिक्षण द्यावयाचे त्या सहकारी कार्यकर्त्यांना शिक्षणाबद्दल कळकळ व आस्था नाही, हा खरा सहकारी प्रशिक्षणामधील प्रश्न आहे.

### पुढाऱ्यांच्या हितसंबंधांचा दुष्परिणाम

" सहकारी संस्थांमध्ये पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी अनेक प्रकारचे हितसंबंध निर्माण केलेले आहेत, आणि ही मंडळी या चळवळीच्या निकोप विकासात अडथळे निर्माण करीत आहेत. सहकारी चळवळीचा फायदा घेऊन जे शेतकरी धनवान बनले, त्यांनी आज या चळवळीतील महत्त्वाच्या जागा आपल्या हाती घेतल्या असून, आता चळवळीचा फायदा लहान शेतकऱ्यापर्यंत किंवा शेतमजुरापर्यंत पोंचविणाच्या कार्यात ते अडथळे निर्माण करीत आहेत; इतकेच नव्हे तर, आपल्याजवळील संपत्तीचा उपयोग राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी किंवा ती मन मानेल तशी राबविण्यासाठी करीत आहेत. सहकारी चळवळीच्याद्वारा मागासलेल्या वर्गाचे कल्याण करण्याचे आणि संपूर्ण खेडेविभाग सुधारण्याचे ध्येय मागे पडत चालले आहे. आपल्या हितसंबंधाला बाध येईल, या शंकेने ही मंडळी प्रशिक्षितांना या चळवळीच्या कामात सहभागी करून घेण्याचेही पद्धतशीर टाळीत आहेत.

### राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप

"एका बाजूला दरवर्षी अनेक प्रशिक्षित विद्यार्थी बाहेर पडतात. परंतु सहकारी संस्थांमध्ये प्रशिक्षितांना नोकऱ्या मिळत नाहीत, आणि अप्रशिक्षितांना नोकऱ्या दिल्या जातात, हे अनिष्ट आहे. सहकारी चळवळीच्या क्षेत्रात राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप क्रमशः वाढत आहे. अनेक सहकारी संस्थाचे हिशेब अलीकडे वेळच्या वेळी तपासले नाहीत. ते तपासले आणि त्या संस्थेच्या कारभारात काही अफरातफर आढळली तर ते प्रकरण शिक्षेच्या पातळीपर्यंत पोंचतच नाही; इतकेच नव्हे तर अशी संस्था " अ " वर्गातच राहण्यासाठी नेते हस्तक्षेप करीत आहेत. त्यामुळे आज अनेक संस्थांमधून पैशांच्या अफरातफरीचा बुजबुजाट झाला आहे. या दृष्टीने सहकारी संस्थांचेही "कुटुंब नियोजन" करावे असे मला वाटते."

---

### आयुर्विम्याच्या धंद्यात वाढ

आयुर्विमा कॉर्पोरेशनने १९६७–६८ साली ८४४·४७ कोटी रुपयांच्या नव्या विमा पॉलिसी दिल्या. त्यामागील वर्षाशी तुलना करता नव्या धंद्यात ७४.३ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. कॉर्पोरेशनने अहवालाच्या साली ग्रामीण भागात अधिक संख्येने पॉलिसी दिलेल्या आहेत. एकूण ५० लाख पॉलिसी नव्याने देण्यात आल्या. त्यापैकी १४.२३ लाख अथवा ३५.८ टक्के पॉलिसी ग्रामीण भागातील लोकांना दिलेल्या होत्या. त्या सर्वांची दर्शनी किंमत २५०.४६ कोटी रुपये आहे. एकूण पॉलिसींपैकी ६७ टक्के पॉलिसीज १,००१ ते ६,००० रुपयांच्या आहेत. आयुर्विमा कॉर्पोरेशन ८ परदेशात धंदा करीत आहे. ह्या देशांतून ९.०७ कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविण्यात आला. पॉलिसींची संख्या ४,६६३ आहे. ३१ मार्च, १९६८ अखेर एकूण ५,२४० कोटी रुपये किंमतीच्या पॉलिसी चालू होत्या.

---

### बंदरापेक्षा बंदराचा रस्ताच अधिक खर्चाचा

ओरिसातील परादीप ह्या बंदराचा विकास करून राज्यातील लोखंडाचे खनिज जपानला पाठविण्याचे ठरविण्यात आले. लोखंडाच्या खाणीपासून बंदरापर्यंत चांगला रस्ता बांधण्याचे कामही हाती घेण्यात आले. ह्या रस्त्यासाठी आतापर्यंत १९ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हा खर्च परादीप बंदराचा विकास करण्यासाठी लागलेल्या खर्चापेक्षाही अधिक आहे, अशी माहिती राज्य सरकारच्या व्यापारमंत्र्यांनी दिली आहे. रस्त्यासाठी झालेला खर्च तो वापरणाऱ्या वाहनांकडून 'टोल' घेऊन भरून काढावा अशी योजना होती. परंतु तसे केल्यास खनिजाच्या वाहतुकीचा खर्च वाढेल आणि म्हणून किंमतही वाढेल. ह्या कारणासाठी भारत सरकारने 'टोल' घेण्यास मनाई केली आहे.

## मोटारींच्या एंजिनांचा नवा कारखाना

हिंदुस्थान मोटर्स ह्या कंपनीने बंगाल्यातील उत्तरपाडा ह्या ठिकाणी प्रवासी व मालवाहतुकीच्या मोटारींना लागणारी एंजिने बनविण्याचा कारखाना स्थापन केला आहे. त्याच्या कामाला आता प्रारंभ झाला आहे. अमेरिकेतील जनरल मोटार कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांच्या हस्ते कारखान्याचे उद्घाटन झाले. ह्या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की तंत्रज्ञान आणि वाहतूक ह्या दोन आघाडीवर अमेरिका पुढारलेली असल्याने तिला आर्थिक व औद्योगिक जगात पुढारीपण मिळालेले आहे. ह्या दोन्ही क्षेत्रांत प्रगती केल्यास भारतालाही भरभराटीचे दिवस येतील ह्यात शंका घेण्याचे कारण नाही. रस्त्यावरील वाहतुकीच्या बाबतीत भारत जी प्रगती करीत आहे ती निःसंशय उत्तेजक आहे. भारताच्या मोटारींच्या उद्योगधंद्यात आज उद्घाटन झालेल्या कारखान्याला ऐतिहासिक महत्त्वाचे स्थान आहे. कारखान्याच्या उद्घाटन समारंभासाठी देशांतील अनेक भागांतून उद्योगपती व व्यापारी आले होते. कारखान्यातून दरसाल २८ हजार प्रवासी मोटारींची आणि १५ हजार वाहतुकीच्या मोटारगाड्यांची एंजिने तयार होऊ शकतील. तयार होणाऱ्या एंजिनांची अश्वशक्ती प्रत्येकी ११५ असून भारतात तयार होणाऱ्या शक्तिशाली एंजिनांत त्यांची गणना करावी लागेल. हिंदुस्थान मोटार्सचे अध्यक्ष श्री. बी. एम्. बिर्ला ह्यांनी उपस्थितांचे स्वागत करून सरकारच्या नियोजनाविषयी तक्रार केली. त्यांच्या मताने भारताची औद्योगिक प्रगती फार हळूहळू होत आहे. भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन सरकारी अगर बिनसरकारी पातळीवरून केंद्रीभूत पद्धतीने होऊ शकणार नाही.

---

## कुटुंबनियोजनासाठी गोळी

कुटुंबनियोजन करण्यास उपयोगी पडतील अशा तोंडाने घेण्याच्या गोळ्या तयार करण्याचा कारखाना भारतात स्थापन करण्यात आला आहे. ह्या गोळ्यांचा उपयोग जगातील १·५ कोटी स्त्रिया आजही करीत आहेत. गोळ्यांचा उपयोग कितपत होतो ते पाहण्यासाठी त्या सीलोन, मलेशिआ, पाकिस्तान व भारत ह्या देशांतून प्रयोगादाखल वापरण्यात आल्या आहेत. त्यांचा उपयोग करून कुटुंबनियोजन यशस्वीपणे करता येते असे सिद्ध झाले आहे. गोळ्या २१ दिवस ओळीने घ्याव्या लागतात आणि त्यांची किंमत सुमारे ५ रुपये आहे. भारतासारख्या मागासलेल्या देशांत कुटुंबनियोजनाच्या इतर साधनांपेक्षा हे नवे साधन अधिक फलदायी होईल असे तज्ज्ञांचे मत आहे.

---

## आहारातील लोहाची कमतरता भरून काढा

माणसाची शारीरिक आणि मानसिक कार्यक्षमता योग्य त्या पातळीवर राहण्यासाठी समतोल आहाराची जरुरी सर्वमान्य झालेली आहे. असा आहार घेणे गरीब लोकांना पुष्कळदा परवडणारे नसते. पण ज्यांना तो परवडतो तेही समतोल आहार घेतातच असे नाही. कारण आहाराविषयींच्या शास्त्रीय सत्यांची जाणीव असली तरीही ती प्रत्यक्ष कृतीत उतरविली जात नाहीत. आहारात लोहयुक्त पदार्थांची कमतरता असल्यास त्यामुळे रक्तक्षयाचा आजार उद्भवतो. मुंबई येथील के. ई. एम. इस्पितळातील डॉ. पटेल ह्यांनी ह्याविषयी महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. शाकाहारी आणि मांसाहारी अशा दोन्ही प्रकारच्या लोकांच्या आहारात लोहसत्त्वयुक्त अन्न कमी असते. म्हणून तसे अन्नपदार्थ घेण्याचे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. ते म्हणतात की शाकाहारी लोकांनी धान्याचा वापर करताना त्यावरील कवच काढून टाकू नये. कारण, ह्या कवचाच्या कोंड्यात शरीराला उपयुक्त ठरणारे लोह भरपूर प्रमाणात असते. त्याचप्रमाणे रोज २ औंस गूळ आणि शक्यतर काळ्या वर्णाचा भाजीपाला खाण्याची प्रथा ठेवावी. मांसाहारी लोकांनी मांसाची निवड करताना पूर्ण रक्तवर्णे मांसाला प्राधान्य द्यावे. फिक्या लाल रंगाचे मांस लोहसत्त्वाच्या बाबतीत कमी पडते. त्याचप्रमाणे मासळी खातानाही करड्या आणि काळपट रंगाच्या मासळीला प्राधान्य द्यावे. पांढऱ्या रंगाच्या पॉपलेट माशापेक्षा वरील रंगाच्या माशांत अधिक पचनक्षम लोह असते. अंड्यातील पांढऱ्या बलकापेक्षा पिवळ्या भागात अधिक लोह असते. आहारशास्त्रातील ही माहिती तशी नवी नाही. परंतु तिचा व्यवहारात उपयोग करून घेतला जात नाही, ही खरी अडचण आहे.

---

## आधुनिक यंत्रसामग्रीच्या भाताच्या गिरण्या

भारत सरकारने अद्ययावत यंत्रसामग्री बसविलेल्या आणखी बऱ्याच भात सडण्याच्या गिरण्या उभारण्याचे ठरविले आहे. त्याचबरोबर सध्या चालू असलेल्या गिरण्यांचे आधुनिकीकरण करण्यासही प्रारंभ करण्यात येणार आहे. सात गिरण्या नव्याने स्थापन करण्यात यावयाच्या असून त्यातील ६ सहकारी मालकीच्या विभागात असतील; एक सार्वजनिक मालकीच्या विभागात असेल. ह्या सर्व गिरण्यांचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. नव्या यंत्रसामग्रीच्या गिरण्या चालविण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी प्रशिक्षण देऊन तयार केलेल्या एंजिनिअर्सची आवश्यकता आहे. खरगपूर येथील तंत्रविज्ञान संस्थेत एंजिनिअर्सना शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ह्या बाबतीत मध्यवर्ती सरकारच्या अन्न खात्याचे सहकार्य घेण्यात आले आहे.

---

## पैशाची झळ सोसणे नेहमीच कठीण

एखादा माणूस पैशाच्या अडचणीत सापडला की त्याला पूर्वी गाठच्या भावासारखे मानणारे पुष्कळ भेटतात. पण, त्यांच्याकडे पैशाची गोष्ट काढली की नूर पालटतो. असाच अनुभव देशा-देशांतील संबंधातही येतो. गेल्या वर्षी जूनमध्ये इस्राइलने अरब देशांना युद्धात पराभूत केले. पराभवाचा शांतताकालीन तडाखा जॉर्डन ह्या देशाला सर्वात अधिक बसला. जेरुसलेम शहर इस्राइलच्या ताब्यात गेले आणि जॉर्डनचे हौशी प्रवाशा-पासून मिळणारे उत्पन्न बुडाले. तेव्हा त्याला अरब देशांनी आर्थिक सहाय्य देण्यास प्रारंभ केला. दरसाल ७२ कोटी रुपयांच्या ह्या मदतीत कुवाइतचा वाटा ३० कोटी रुपयांचा होता. पुढे त्या देशाच्या चलनाचे अवमूल्यन करण्यात आले व कुवाइतचा वाटा ४·५ कोटींनी एकदम कमी करण्यात आला. जॉर्डनने पहिल्याइतकीच मदत मिळावी म्हणून खटपट केली, पण ती असफल झाली.

---

## ही हृदयाची चोरी तशी नाही!

हृदय चोरण्याचा नाजूक खेळ सामान्यतः प्रियकर आणि प्रेयसी ह्यांचा आहे. वैद्यक शास्त्राचा ह्या खेळाशी खरे म्हणजे काही संबंध नाही; निदान नसावा. पण शास्त्रीय शोधामुळे उलटे पालटे होणाऱ्या ह्या जगात काहीच अशक्य दिसत नाही. दक्षिण आफ्रिकेतील डॉ. बर्नार्ड ह्यांनी मि. स्मिथ नावाच्या हृदयविकाराच्या रोग्याचे काळीज बदलून टाकले. पण हे काळीज त्यांनी चोरून मिळविले अशी शंका घेऊन एका आफ्रिकन तरुणीच्या नातलगांनी डॉ. बर्नार्ड व त्यांचे सहायक ह्यांच्यावर फिर्याद केली आहे. ह्या मृत तरुणीचे हृदय मि. स्मिथ ह्यांच्या देहात बसविण्यात आले आहे, असा त्यांचा दावा आहे. तरुणीचे हृदय मिळविण्यासाठी मोठी रक्कम मोजण्यात आली अशा अफवा आहेत. ही तरुणी ज्या धर्माची अनुयायी होती त्यात मृत्यूनंतर अवयव तोडण्याची परवानगी नाही.

---

## चित्रपट निर्मात्याचे खडतर नशीब

गेल्या ऑगस्ट महिन्यात रशिअन लष्कराने एकाएकी मोहरा करून झेकोस्लोव्हाकिआ व्यापला. ह्या प्रसंगात एक चित्रपट निर्माता सापडला व त्याची विलक्षण तारांबळ उडाली. दुसऱ्या महायुद्धातील एका अटीतटीच्या युद्धप्रसंगाचे चित्रण करण्यासाठी तो जर्मनीत जात होता. त्याने ऑस्ट्रियन सरकारकडून काही रणगाडे व चिलखती गाड्या भाड्याने घेतल्या होत्या. रशिआचे सैन्य झेकोस्लोव्हाकिआत घुसल्यावर त्याला ही सर्व सामग्री सोडून पळ काढावा लागला. त्याशिवाय चित्रपट घेण्याची काही यंत्रसामग्री व रंगीत कच्ची फिल्मची ४० भेंडोळीही टाकून यावी लागली. झेकोस्लोव्हाकिआचे सरकार चित्रपटाची सामग्री परत मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. पण रणगाडे व इतर लष्करी सामग्री रशिआ परत करणे अशक्यच आहे.

## इंग्लंडचे श्रीमंत राजघराणे

ब्रिटनचे सनदशीर राजघराणे अत्यंत श्रीमान् आहे. ब्रिटन-मधील जमीनदारीत त्याचा दुसरा क्रमांक लागतो. शिवाय राजघराण्याचा प्रमुख,त्याचा लवाजमा, नातेवाईक, इत्यादींचा खर्च भागविण्यासाठी खूप मोठी रक्कम लागते, ती वेगळीच. राजपदी बसणाऱ्या प्रमुख व्यक्तीसाठी दरसाल ७॥ कोटी रुपये खर्च लागतो. त्याशिवाय राजघराण्याच्या नातेवाइकांना तनखे द्यावे लागतात. राजप्रासाद, विमाने, सुखसंचाराच्या बोटी, इत्यादीं-वरही बराच खर्च करावा लागतो. ब्रिटनची राणी एलिझाबेथ, हिचा आज जगात तिसऱ्या क्रमांकाची श्रीमंत स्त्री म्हणून क्रमांक लागतो. तिच्या मालकीची मालमत्ता १५० ते २७५ कोटी रुपयांची असावी. बॅकिंगहॅम राजवाड्यातील तिचा खर्च वाढल्यामुळे तेथे आता पूर्वीइतके घोडे ठेवत नाही.

---

## हिटलरच्या लष्करी वस्तुसंग्रहालयाचे भवितव्य

जर्मनीतील म्युनिक शहरात हिटलरने स्थापन केलेले एक लष्करी वस्तुसंग्रहालय होते. ही इमारत दुसऱ्या महायुद्धात बॉंबफेकीने उध्वस्त झालेली असून अजूनही तशाच अवस्थेत उभी आहे. तिच्या भोंवताली रान माजून राहिले आहे. हिटलरच्या लष्कराने केलेल्या अनन्वित अत्याचाराची स्मृती म्हणून ही इमारत कायम ठेवावी किंवा कसे, ह्यासंबंधी म्युनिकची स्थानिक संस्था गेले वर्षभर विचार करीत आहे. ह्या इमारतीच्या जागेतून मोठा राजरस्ता काढण्यात यावा असा आग्रह धरण्यात येत आहे. पण, त्यासाठी इमारत पूर्णपणे पाडावी लागेल. बऱ्याच नागरिकांचे मत असे आहे की, लष्करी हुकूमशाहीची निशाणी असलेली ही इमारत नाहीशी करणेच अधिक योग्य होईल.

## " तुम्ही मिळवा, आम्ही खर्चून दाखवू "

ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या बैठकीत बोलताना मध्यवर्ती सरकारच्या औद्योगिक विकास खात्याचे उपमंत्री, श्री भानुप्रसाद सिंग, ह्यांनी परदेशी चलन मिळविण्या-साठी निर्गतवाढीचे महत्त्व प्रतिपादन केले. ह्या उपदेशाने निर्माण होणारी डोकेदुखी कमी करण्यासाठी विनोदाने ते म्हणाले " परदेशी चलनाची कमाई करणे, हे उद्योगपतींचे काम आहे. ते खर्चून टाकण्याचे काम आम्हां मंत्र्यांच्याकडे सोपवा. "


---

## तिसऱ्या घाटरस्त्यासाठी पाहाणी

सध्या मुंबईहून देशावर जाणाऱ्या आगगाड्यांना दोन घाट उपलब्ध आहेत. एक कसारा घाट ( कसारा आणि इगतपुरी ह्यांचे दरम्यान ) आणि दुसरा बोर घाट ( कर्जत आणि लोणावळा ह्यांचे दरम्यान ). रेल्वे वहातुकीमधील वाढ लक्षात घेऊन तिसरा घाटरस्ता करण्यासाठी पाहाणी करण्यास पश्चिम रेल्वेने रेल्वे बोर्डाची मंजुरी मागितली आहे.

## साठे किसान-बंधाऱ्याचे कल्पक निर्माते

# श्री. श्री. रा. साठे



श्री. श्रीधर रामचंद्र साठे यांचा जन्म १ नोव्हेंबर, १९०९ रोजी गागोदे बुद्रुक, ता. पेण, जि. कुलाबा येथे झाला. योगायोग म्हणजे सदर गावी व जागेत श्री. विनोबा भावे यांचाही जन्म झालेला आहे.

श्री. साठे दीड वर्षाचे असताना आई प्लेगने वारली. घरची स्थिती चांगली होती. वडिलांचा व्यापार होता. परंतु १८९६ सालचे दुष्काळात अन्नछत्र घालून मुकरीत्या सर्व दान केले. जे राहिले ते व्यापारात गेले. त्यांनी नाशिक प्रकरणात भरपूर कार्य केले. प्लेगमध्ये क्वारंटाईन स्वतः चालवून लोकांचे हाल वाचविले व पुढे तीर्थाटने केली. शेवटी मुलाजवळ राहून गावी निवर्तले. नंतर श्री. श्री. रा. साठे ह्यांचे पालन-पोषण व शिक्षण आजोळी व वडील-बंधूकडे पेण येथे झाले. त्यांना लहानपणापासून यंत्र संशोधनाचा छंद होता. १९३० साली मॅट्रिक होऊन छंदाकरता गाव सोडले. वर्षभर भिवंडीस दांडेकरांचे कारखान्यात नऊ आणे रोजावर नोकरी केली. तेथे भाताच्या गिरणीच्या रचनेत पुष्कळ नवीन सुधारणा केल्या. १९३२ ते ३५ डहाणूस हिंद मेकॅनिकलमध्ये राहिले.

पुढे निव्वळ गाईचे दुधाचा धंदा करण्याची कल्पना डोक्यात आली. परंतु ती सोडून गावी भावाकडे शिकून पुण्यात प्रथमच सुधारित यंत्रावर कापूस पिंजून गाद्या वगैरे करण्याचा धंदा १९३५ अखेर पुण्यास सुरू केला. पुढे कोल्हापूर, बडोदा, बारामती, रत्नागिरी, या ठिकाणी गादी कारखाने सुरू केले. मालाचा दर्जा सतत ठेवणे व योग्य दर यामुळे धंदे महशूर झाले. धंद्यात जम बसल्यानंतर म्हैसाळचे श्री. फाटक यांची कन्या कु. शांताबाईशी ११-७-१९३७ रोजी विवाह झाला.

संशोधनाचे कार्याकरता "टिळक संशोधन मंदिर" या नावे वर्कशॉप ठेवून लहानशी संशोधनशाळा स्वतः खर्चाने सुरू केली व चालविली आहे. यात खादी-ग्रामोद्योग साधनांचे संशोधन केले. त्यात बैलाने चालणारा पाण्याचा पंप, पिठाची गिरणी, वगैरेवर चांगले संशोधन केले आहे. परंतु यांत्रिक शक्तीपुढे ही साधने टिकणार नाहीत.

खादी व चरख्यावर पुष्कळच संशोधन केले व त्यात चांगले यशही मिळाले व त्याकरता खादी कमिशनने सर्वोच्च पाच हजार रुपयांचे बक्षीस दिले.

परंतु या शोधाचा खादी कमिशनने उपयोग करून घेतला नाही. अजून प्रत्यक्ष अनुभवाने विश्वास आहे की जर ही यंत्र-रचना वापरात आणली गेली तर खादी ही गिरणीच्या कापडाच्या किमतीचे आसपास विकता येईल. याकरता जर प्रोत्साहान मिळाले तर अजूनही हा प्रयोग करून दाखवण्याची तळमळ आहे. १९४२ चे चळवळीत भाग घेतला. परंतु तुरुंगवास घडला नाही. १९५९ साली पंडित नेहरूंनी त्यांचे निवासस्थानी तासाचेवर मुलाखत देऊन श्री साठे ह्यांची चरखा सुधारणा पाहून अत्यंत संतोष व्यक्त केला.

संशोधन हे त्यांचे एक वेड आहे. ते सुटत नाही. चरखा खाते बंद पडले तरी काहीनाकाही खटपट सुरूच असते.

वारंवार अवर्षणे व पाणीटंचाई पाहून धान्यवाढ व पिण्याचे पाण्याचा प्रश्न या दृष्टीने एक साधन म्हणून छोट्या धरणांचे बाबत संशोधन त्यांनी सुरू केले. याकरता पुणे जिल्हा परिषदेने सर्वतोपरी सहाय्य केले.

एक काढत्या-घालत्या लोखंडी धरणाची कल्पना प्रत्यक्ष व्यवहारात साकार झाली.

संसारात, संशोधनात व सुखदुःखात श्री. साठे ह्यांच्या पत्नी प्रथमपासूनच सक्रिय सहकार्य देत आहेत हे त्यांचे एक थोर भाग्य आहे. त्यांच्या कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ते दोघे काँग्रेसच्या विधायक कार्यात भाग घेत असतात. पुणे शहर काँग्रेसच्या स्त्री-संघटनेच्या अध्यक्षा म्हणून सौ. साठे ह्यांनी काम केले आहे व दप्तरी एक यशस्वी कार्य अशी नोंद झाली आहे.

देशात स्वातंत्र्यानंतर पुष्कळच सरकारी प्रचंड सुसज्ज अशा संशोधन शाळा झाल्या असून कार्य करीत आहेत. कामही होत आहे. परंतु एक उणीव भासते. तेथे फक्त पदवीधर, वगैरेंनाच स्थान आहे. समाजात थोडाच पण असा एक वर्ग आहे की तो पदवीधर नसला तरी त्याची उपजत संशोधन बुद्धी व वृत्ती फार वरच्या दर्जाची आहे. अशांना कार्यस्थान मिळावे म्हणून त्या दृष्टीने संशोधन शाळा काढणे हा आवश्यक उद्देश त्यांच्या मनात आहे.

आता सर्वांच्या जिव्हाळ्याच्या धरणाच्या संशोधनाची थोडक्यात माहिती येथे दिली आहे.

मोठी धरणे होऊन पुष्कळ जमीन पाण्याखाली आली आहे. शेतकरी सुधारला आहे. परंतु ८० टक्के जमीन व शेतकरी पावसाचे मर्जीवरच राहिला आहे. अवर्षणाचे भागांतही वर्षातून ७।८ वेळा नाल्यांना पाणी येऊन आपले डोळ्यादेखत निघून

जाते. हे पाणी " साठे-किसान बंधाऱ्याने " अडवून उपयोगी होत आहे.

(१) हे धरण चार फुटी लोखंडी झडपा खांबांना बसवून घातले जाते. अल्प वेळात असे ५० फूट रुंदीचे धरण चार माणसे सहज ३ तासात घालू अगर काढू शकतात.

(२) चार फूट उंचीपासून १ फुटाने चढत १६ फूट उंचीचे व वाटेल तेवढे ५०० फूट रुंदीचे धरण घालता येते.

(३) यामुळे प्रवाहात गाळ साठणे, बाजूची जमीन वाहून जाणे, वगैरे शक्यता कमी. कारण पावसाळ्यात धरण खांबासुद्धां संपूर्ण काढून ठेवता येते व जरूरीचे वेळी धरण घालून पाणी अडवून याचा उपयोग शेतीला आणि पिण्याला होऊ शकतो.

(४) असे पाणी अडवल्याने बाजूचे विहिरींना पाणी राहते. काठाने चारा झाडे वाढू शकतात व मासळीही होते. असे अनंत फायदे आहेत.

(५) अशा बंधाऱ्याखाली लाखो एकर जमीन पाण्याखाली येऊ शकणार आहे.

हे सर्व पटून पुणे, कुलाबा, रत्नागिरी जिल्हा परिषदांनी अशी पुष्कळ धरणे करून घेतली आहेत व त्यांचा भरपूर फायदा मिळत आहे. ते आणखी धरणे करून घेत आहेत.

महाराष्ट्र राज्य, गुजरात राज्य व मध्यवर्ती सरकार यांनी या योजनेची तपासणी करून त्यांची उत्तम प्रकारे शिफारस केली आहे.

साठे बंधाऱ्याबद्दल आणखी माहिती श्री. श्री. रा. साठे ४१८ नारायण पेठ, पुणे २ (फोन ५७७५६) यांचेकडे मिळू शकेल.

## पूर्व युरोपीय देशांशी होणारा भारताचा व्यापार

पूर्व युरोपातील देशांशी होणाऱ्या व्यापाराची वृद्धी करण्याची शक्यता अजमावण्यासाठी भारत सरकारच्या व्यापार-खात्याचे दुय्यम मंत्री एक प्रतिनिधिमंडळ घेऊन तिकडे गेले होते. त्यांनी पूर्व युरोपातील पोलंड, बल्गेरिआ, हंगेरी आणि रुमेनिआ ह्या देशांचा दौरा करून काही व्यापारी करारमदार केले आहेत. ह्या करारांमुळे भारताच्या व ह्या देशांच्या व्यापारात काही दूरगामी बदल घडून येणार आहेत. पाश्चात्य प्रगत देशांशी व्यापार करताना ते देश भारताकडून संस्कारित पक्का माल घेण्यास तयार नसतात. त्यांना भारताकडून मुख्यतः विविध स्वरूपाचा कच्चा माल हवा असतो असा अनुभव आहे. प्रगत देशांच्या ह्या आग्रहामुळे भारताची निर्यात व्यापारापासून होणारी प्राप्ती वाढविणे बिकट होते आणि परिणामी भारताच्या विकास योजनांसाठी लागणारा भांडवली माल व्यापारी देवघेवीतून मिळविणे अवघड होते. पूर्व युरोपमध्ये गेलेल्या प्रतिनिधिमंडळाने केलेल्या नव्या करारामुळे १९६९ सालापासून ते देश भारताकडून औद्योगिक आणि इंजिनिअरिंगचा माल आयात करू लागतील. पोलंडशी केलेल्या दीर्घकालीन करारानुसार १९७३ पर्यंत पोलंडकडून भारताला मिळावयाच्या गंधकाच्या पुरवठ्यात वाढ करण्यात येईल. त्या सुमारास १७ लाख टन गंधक आंतरराष्ट्रीय किंमतीप्रमाणे मिळू लागेल. पोलंड भारताकडून रेल्वेचे वाहतुकीचे डबे, कापड गिरण्यांची यंत्रसामग्री, विजेची उपकरणे, मोटारीचे सुटे भाग, इत्यादी माल घेणार आहे. पोलंडप्रमाणेच बल्गेरिआ व रुमेनिआ ह्या देशांशीही व्यापारी करार करण्यात आले आहेत.

## आयुर्विम्याचे दर उतरण्याची शक्यता

हयातीमधील व हयातीनंतरच्या विम्याच्या पॉलिसींसाठी आकारले जाणारे हप्त्याचे दर कमी करण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ह्या विषयाचा विचार करण्यासाठी अर्थ-खात्याने विमागणितयांच्या साह्याने अभ्यास चालविला होता. अजून ह्या तज्ज्ञांचा अहवाल तयार झालेला नाही. परंतु त्यांनी गोळा केलेल्या माहितीवरून असे दिसून आले आहे की सध्याचे दर फार असून ते कमी केल्यामुळे आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या प्राप्तीला काही अपाय पोचण्याचा संभव नाही. आयुर्विमा करणाऱ्या खाजगी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण १९५६ मध्ये करण्यात आले. तेव्हापासून हप्त्याच्या दरात घट करण्यात आलेली नाही. ब्रिटनमध्ये गेल्या दहा वर्षांत हयातीमधील व हयातीनंतरच्या विम्याच्या दरात बरीच घट करण्यात आलेली आहे. तशीच घट भारतातही करता येण्यासारखी आहे.

## भुसावळनजीक सुताची सहकारी गिरणी

भुसावळपासून दोन मैलांवर महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल उभारण्यात आली आहे. ह्या गिरणीचे उद्घाटन थोडेसे लांबणीवर पडले आहे. गिरणीला लागणाऱ्या यंत्र-सामग्रीच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे हा प्रसंग ओढवला आहे. मुळात गिरणीच्या संपूर्ण सामग्रीसाठी ७३ लाख रुपये भांडवल लागेल असा अंदाज होता. परंतु आयात करण्यात येणाऱ्या यंत्रांची किंमत वाढल्यामुळे व त्यावरील जकातीमुळे आता १ कोटी, २० लाख रुपये भांडवल लागणार आहे. गिरणीसाठी भुसावळनजीक ५८ एकरांची जागा मिळविण्यात आली. गिरणीचे बांधकामही जवळ जवळ पूर्ण झाले आहे. काही थोडी यंत्रसामग्री सोडून बाकीची उभारली गेली आहे. गिरणीत ३०० लोकांना रोजगार मिळेल.

## परदेशी भांडवल गुंतवणुकीसाठी बोर्डाची स्थापना

परदेशांतून भारतात गुंतविण्यात येणाऱ्या भांडवलावर लक्ष ठेवण्यासाठी भारत सरकारने एका बोर्डाची स्थापना करण्याचे ठरविले आहे. हे बोर्ड सुमारे महिन्याभरात आपले कामकाज पाहू लागेल. परदेशीय भांडवलाच्या भारतात होणाऱ्या गुंतवणुकीचे कामकाज पाहणे आणि परदेशी कंपन्यांच्या सहकार्याच्या कराराची व्यवस्था बघणे ही कामे बोर्ड मुख्यतः करील. बोर्डाची घटना आणि कार्यपद्धती याबद्दल सरकारच्या औद्योगिक विकास व कंपनी कायदा खात्याने अखेरचे निर्णय घेतले आहेत. वरील दोन्ही बाबतींतील व्यवहाराबाबत बोर्ड सरकारला जबाबदार राहील. तथापि काही विशेष महत्त्वाची खास प्रकरणे मंजुरीसाठी बोर्ड सरकारकडे पाठवील.

### बँकेशी व्यवहार करण्याचे सुंदर कारण !

बँकेच्या गिऱ्हाइकांना कमी व्याजाने कर्जे हवी असतात, सेव्हिंग्ज खात्यावर जास्त दराचे व्याज हवे असते, त्याचबरोबर आणखीही काही आकर्षण हवे असते. हे ओळखून न्यूयॉर्कच्या नॅशनल बँक ऑफ नॉर्थ अमेरिका ह्या बँकेने आपल्या सर्व, ९० शाखांतून कौंटरवर काम करण्यासाठी सुंदर तरुणी नेमण्यास प्रारंभ केला आहे. विमानवाहतुक कंपन्या हवाई सुंदरींची ( स्टुअर्डेस ) नाही का नेमणूक करीत ? बँकेने ५७० तरुणींना पोषाख पुरवून कौंटरवर काम करण्यास सुसज्ज केले आहे. त्यांना केशरचना, आकर्षक व्यक्तिमत्त्वाची निर्मिती, मेक अप्, इत्यादींत तरबेज केले जाते. अर्थात, बेरीज-वजाबाकी त्यांना यावी लागतेच ! बँकेच्या गिऱ्हाइकांना अशा बँक नोकरांशी व्यवहार करावयास आवडते. बँकेला १९६४ साली ५० लक्ष डॉलर्स नफा झाला होता, तो गेल्या वर्षी १२५ लक्ष डॉलर्स झाला. त्याचे श्रेय बँकेचे चेअरमन फ्रीडमन हे ह्या नव्या कार्यक्रमालाच देतात !

---

### भद्रावती येथील पोलादाचा कारखाना

म्हैसूर आयर्न अॅन्ड स्टील कंपनी लि. हा कारखाना आता संपूर्णपणे म्हैसूर सरकारच्या मालकीचा झाला आहे. कारखान्यात विशेष प्रकारचे पोलाद तयार करण्याचा एक विभाग अलीकडे उभारण्यात आला आहे. गेली दोन वर्षे ह्या विभागात अनेक प्रकारचे खास पोलाद बनविण्यात येत आहे. विभागाच्या उभारणीसाठी ३६ कोटी रुपयांचे भांडवल लागले असून त्यात २५ निरनिराळया प्रकारचे पोलाद आता बनविण्यात येते. चालू वर्षी ३५ हजार टन वजनाचे खास पोलाद बनविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. कारखान्यातील हा विभाग ७७ हजार टन खास पोलाद निर्माण करू शकेल. पण, सर्वच्या सर्व उत्पादनक्षमता वापरण्यास विभागाला अजून दोन वर्षे लागतील. विभागाचा औपचारिक उद्घाटन समारंभ लवकरच होणार आहे.

---

### रंगीत फिल्म्सच्या उत्पादनाचा कारखाना

रंगीत फिल्म्सचे उत्पादन करणारा कारखाना फ्रान्समधील एका कंपनीच्या सहकार्याने उटकमंड येथे काढण्यात येत आहे. ह्या कंपनीमार्फत येणारा अहवाल अद्याप हाती आलेला नाही. परंतु आता तो लवकरच येईल अशी अपेक्षा आहे. तो हाती आल्यावर हिंदुस्थान फोटो फिल्म्स फॅक्टरी पुढील उद्योगास लागेल. हा कारखाना उभारण्यासाठी आणखी १० कोटी रुपये भांडवल लागणार असून त्याचे बांधकाम व यंत्रउभारणीचे काम पूर्ण होण्यास ३ वर्षांचा अवधी लागेल. तथापि, बांधकाम सुरू करण्यापूर्वी भारत सरकारच्या अर्थखात्याची मंजुरी मिळवावी लागेल. आतापर्यंत कारखान्यात १२ कोटी रुपये घालण्यात आले आहेत.

---


**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.**

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : ९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.
: विभागीय कचेरी : महाल नागपूर.

दूरध्वनी :– २५९८६४, २५९९९७, २५०१८९, २६९६६७

भरपाई झालेले भांडवल व गंगाजळी फंड ... रु ११,९८,८४,०००

ठेवी ... रु. ६३,१८,९३,०००

खेळते भांडवल ... रु. १,१३,२३,७१ ०००

: बृहन् मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( पूर्व ) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे, सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


श्री. वसंतराव पाटील, चेअरमन

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.


---


BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES –

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

### जपान व भारताच्या आर्थिक सहकार्याची जरुरी

जपान व भारत ह्यांच्यामधील व्यापारी सहकार्य वाढविण्याचा विचार करण्यासाठी उभय देशांमधील प्रतिनिधींची एक गोलमेज परिषद् दिल्ली येथे भरविण्यात आली होती. परिषदेचे काम ६ दिवसपर्यंत चालले होते. दोन्ही देशांतील व्यापारी, तज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञ ह्यांचा प्रतिनिधींत समावेश होता. जपानतर्फे ८ प्रतिनिधी हजर होते आणि भारतातर्फे २२ हजर होते. भारताचे उपराष्ट्रपती श्री. गिरी परिषदेचे उद्घाटन करताना म्हणाले की, आर्थिक विकासाच्या बाबतीत जपान व भारत ह्यांनी परस्परांशी निकटचे सहकार्य करण्याची फार गरज आहे. जपानने औद्योगीकरण आणि आर्थिक विकास साधण्यात मोठे यश मिळविले असून ह्या बाबतीत जपानशी सहकार्य करून भारताला खूपसे शिकण्यासारखे आहे. जपानचे तांत्रिक सहकार्य भारताला फार उपयुक्त ठरत आहे.

---


**अमेरिकन कर्ज नाकारले** — अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास संघटनेने इथिओपियाला मोठे कर्ज देण्याचा करार केला होता. करारातील कर्जाचा उपयोग करून पश्चिम इथिओपिआत एक प्रचंड जलविद्युत् केंद्र बांधण्यात येणार होते. अमेरिकन बांधकाम कंपन्यांनी ठरल्यापेक्षा अधिक पैसा मागितल्यामुळे इथिओपिआच्या सरकारने करार रद्द केला आहे. आता जागतिक बँकेकडून कर्ज घेण्यात येणार आहे.

**यंत्रचलित नांगरांना वाढती मागणी** — यंत्रचलित नांगरांना वाढती मागणी आहे. परंतु मागणी पुरविण्याइतके नांगर परदेशातून आयात करण्यास पुरेसे परदेशीय चलन नाही. म्हणून परदेशात राहणाऱ्या हिंदी नागरिकांनी आपल्या नातलगांसाठी ते विकत घेऊन पाठविण्याची सवलत सरकारने दिली आहे.

**इराणला यंत्रसामग्रीची निर्यात** — भारताने इराणला एक केबल कोटिंग मशीन निर्यात करण्याचे कंत्राट मिळविले आहे. ह्या यंत्राची किंमत ४९ हजार रुपये आहे. अशा प्रकारचे औद्योगिक यंत्र निर्यात करण्याची भारताची ही पहिलीच वेळ आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय लघु-उद्योग मंडळाने ते तयार केले आहे. पुरवठ्याची मागणी मिळवितांना परदेशीय स्पर्धेला तोंड द्यावे लागले. आतापर्यंत भारतच अशी यंत्रे आयात करीत असे.

**विजेच्या प्रसारासाठी मदत पाहिजे** — म्हैसूरच्या सरकारची ग्रामीण विद्युत-पुरवठा योजना पैशाच्या टंचाईमुळे मंदगतीने चालू आहे. तिला अधिक गती देण्यासाठी मध्यवर्ती सरकारने आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून मदत मिळवून द्यावी, अशी विनंती राज्य सरकारच्या मुख्य मंत्र्यांनी केला आहे.

**अर्थ** (पाक्षिक)
महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह
"दुर्गाधिवास" पुणे ४.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.